MHST070022502026

**फौ.कि. अर्ज क्र– १३४/२०२६**

**(विनोद भरत धाबुगडे वि. महाराष्ट्र सरकार)**

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

१. सदरचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ प्रमाणे अपराध क्र. ५९०/२०२६ मध्ये कराड शहर पोलीस ठाणे यांनी भारतीय न्याय संहिताचे कलम ३०५(अ) तहत गुन्ह्यातील जप्त केलेले ३९.४०० ग्रॅम वजनाचे एक सोन्याचे व काळे मोठे गंठण व एक १०.६०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण हा मुद्देमाल सुपुर्तनाम्यावर परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, तो वारुंजी, ता.कराड जि.सातारा येथील रहिवाशी असून तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे, कराड शहर येथे अपराध क्र. ५९०/२०२६ भा.दं.वि.संहितेचे कलम ३०५(अ) प्रमाणे नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याच्या तपास कामात पोलीसांनी वर नमूद मुद्देमाल जप्त केलेला आहे. सदरील मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा आहे. त्यामुळे काही अटीवर सदरची जप्त मुद्येमाल अर्जदाराच्या ताब्यामध्ये द्यावी असा आदेश मसूर पोलीस ठाणे यांना करावा, अशी विनंती केली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी मुद्देमालाच्या मालकीबाबत योग्य ती खात्री करुन, योग्य त्या अटी–शर्तीवर आदेश पारित होण्यास हरकत नसलेचे नमुद केले आहे. सहा.सरकारी अभियोक्ता यांनी योग्य तो आदेश पारित करावा असे कथन केलेले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले.

६. याबाबत कोणताही वाद नाही की, सदर मुद्देमाल कराड शहर पोलिसांनी गुन्हा क्र. ५९०/२०२६ या अपराधामध्ये जप्त केलेला आहे. अर्जदाराने अभिलेखावर एफ.आय.आर (निशाणी ६), खरेदीची पावती (निशाणी ७ व ७अ), तक्रारदाराचे शपथपत्र (निशाणी ८) वर, मुळ फिर्यादीचे आधारकार्डची प्रत (निशाणी ९) वर, अर्जदाराचे आधारकार्डची प्रत (निशाणी १०) वर दाखल केलेले आहेत. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा तक्रारदार जयश्री भारती धाबुगडे व अर्जदार यांच्या मालकीचा

आहे असे दिसून येते. अर्जदार हा तक्रारदार जयश्री धाबुगडे यांचा मुलगा असल्याने सदरील मुद्देमाल तिने अर्जदाराला भेट दिलेला असल्याने सदरील मुद्देमाल अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देण्यास हरकत नसल्याबाबत तक्रारदाराने शपथपत्र (निशाणी ८) वर दिलेले आहे. सदरील मुद्देमाल पोलिसांनी वर नमूद केलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेले आहे आणि तेंव्हापासून सदरचा मुद्देमाल हा पोलीस स्टेशनमध्ये आहे. पोलिसांनी व सरकारी वकीलांनी सदर मुद्देमाल योग्य त्या अटी व शर्तींवर अर्जदारास परत करण्यास हरकत नाही असे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामुळे, सदरचा मुद्देमाल काही अटींवर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास ते योग्य व उचीत होईल. परंतू, अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर गुन्हयाच्या तपासकामी ३९.५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण (काळया मन्यांसह) व १०.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण (काळया मन्यांसह) जप्त झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरील मुद्देमाल अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी हा अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, कराड शहर यांना असा आदेश देण्यात येतो की, अर्जदाराने रक्कम रु. ४,००,०००/- ( चार लाख रुपये फक्त) एवढ्या रकमेचे बंधपत्र अथवा हमीपत्र रक्कम रु. ५००/- च्या मुद्रांकावर दिल्यावर त्यांनी अपराध क्र. ५९०/२०२६ मध्ये कराड शहर पोलीस ठाणे यांनी भा.द.वि. कलम ३०५(अ) तहत गुन्ह्यातील जप्त केलेल्या मुद्देमाल म्हणजे ३९.५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण (काळया मन्यांसह) व १०.७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीगंठण (काळया मन्यांसह) अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात खालील अटीस अधीन राहून द्यावे.

अ) तपासी अंमलदाराने मुद्देमालाचा ताबा देतेवेळेस तिची सद्यःस्थिती दर्शविणारी दोन छायाचित्रे काढावीत.

ब) सदरील मुद्देमालाची छायाचित्रे व बंधपत्र हे तपासी अंमलदाराने न्यायालयात दाखल करावीत.

PRASHANT PRAKASHRAO KULKARNI

Digitally signed by PRASHANT PRAKASHRAO KULKARNI
Date: 2026.06.29 16:50:01 +0530

दिनांक – २९/०६/२०२६.

**(प्रशांत पी. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

न्यायालय क्र.३, कराड.